**<u>नियमीत दिवाणी मुकदमा नं.२४७/२०१२ मधील</u>**

**<u>निशाणी-८७, ८९ व ९१ वरील एकत्रित आदेश</u>**

सदरचे अर्ज वादीने **प्रतिवादी क्र.६ - रामदास मारुती सस्ते (जाधव)** हे मयत झाल्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी, **प्रतिवादी क्र.६** यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी व **प्रतिवादी क्र.६** यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेले आहेत.

२. वादी यांचे कथन की, दाव्याचे कामकाज चालू असताना **प्रतिवादी क्र.६ - रामदास मारुती सस्ते (जाधव) हे दि.१०/०२/२०१७** रोजी मयत झालेले आहेत. वादी हे अडाणी व अशिक्षीत असुन त्यांनी प्रतिवादी क्र.६ हे मयत झाल्याची माहिती वकीलांना सांगून देखील वकीलांनी त्याबाबत वादींना काहीही सांगितले नाही, त्यामुळे वादींनी त्यानंतर नविन वकिल नियुक्त केले. नविन वकिलांनी सांगितल्यानंतर दि.०६/०२/२०२० रोजी वादींनी प्रतिवादी क्र.६ यांचा मृत्यूचा दाखल काढला, परंतु त्या दरम्यान कोरोना आजाराचा प्रादुर्भाव असल्यामुळे प्रतिवादी क्र.६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ होऊन प्रतिवादी क्र.६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यात यावे. वादीने कथनाच्या पृष्ठार्थ निशाणी-८८, ९० व ९२ वर प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहेत. तसेच निशाणी-८६ च्या यादीसोबत प्रतिवादी नं.६ यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या मूळ प्रत दाखल केली आहे, ज्यानुसार **प्रतिवादी क्र.६ - रामदास मारुती सस्ते (जाधव)** हे **दि.१०/०२/२०१७** रोजी मयत झालेले आहेत.

३. प्रतिवादी विधीज्ञांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असुन अर्जास विरोध केला आहे. प्रतिवादी यांचे कथन की, अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण नमुद केलेले नसुन वादी यांनी प्रतिवादी क्र.६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास जाणूनबुजून विलंब केलेला आहे, त्यामुळे सदरचे अर्ज नामंजूर करावे अशी विनंती केली आहे.

तसेच जर अर्ज मंजुर करण्याचा मे न्यायालयाचा अभिप्राय झाल्यास वादी यांचेकडुन प्रतिवादी यांना जास्तीत जास्त कॉस्ट देण्याचा हुकूम करण्यात यावा.

४. वादीने सदरचे अर्ज दि.१७/०९/२०२२ रोजी दाखल केलेले आहेत. अर्ज ९० दिवसांच्या आत दाखल न झाल्याने **प्रतिवादी क्र.६** यांचेविरुध्द दावा अबेट झालेला आहे. सदर दावा ठराव, वाटप, स्वतंत्र कब्जा व निरंतरचे ताकीदीसाठीचा आहे. वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक आहे. तसेच सदरील दाव्याचे स्वरुप पाहता व दावा पुर्ण गुणदोषावर निर्णयीत करण्यासाठी सदरील दाव्यामध्ये मयत **प्रतिवादी क्र.६ – रामदास मारुती सस्ते (जाधव)** यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे, परंतु अर्ज करण्यास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादी यांचे झालेले नुकसान देखील नजरअंदाज करुन चालणार नाही. त्यामुळे सदरील अर्ज हे योग्य दंड लावून मंजूर करणे न्यायाचे ठरले. कारणे आदेश :–

**आदेश**

(१) अर्ज रक्कम **रु.८००/–** च्या दंडासह मंजूर करणेत येत आहेत.

(२) दंडाची रक्कम वादी यांनी प्रतिवादी यांना पुढील तारखेपर्यंत दिल्यानंतर दाव्यात दुरुस्ती करुन **प्रतिवादी क्र.६ – रामदास मारुती सस्ते (जाधव)** यांचे वारस अभिलेखावर घ्यावेत.

सही/–XXX

दिनांक : ०५/०१/२०२३.

(श्री. एम. एस. भरड)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.